६. हे खरे खरे व्हावे...

● ऐका. म्हणा. वाचा.

हवेवरी त्या होत स्वार मी
अवकाशी विहरावे,
मनात माझ्या नेहमी येते
मी पक्षी व्हावे...

दवबिंदू होऊनी पहाटे
गवतावर उतरावे,
सूर्यप्रकाशे वाफ होऊनी
पुन्हा पुन्हा परतावे...

क्षितिजावरचे गडद रंग मी
ढग होऊनी झुलावे,
भरारणारा होऊन वारा
चंद्राशी खेळावे...

धुक्यापरी मी अलगद अलगद
धरणीवर उतरावे,
अवघे जग झाकूनी तयाला
मिष्किलतेने पहावे...

उर्जेचा तो स्रोत सूर्य मी
अगदी जवळून पहावा,
काळोखाला चिरत चिरत मी
सूर्य किरण व्हावा...

निसर्गातल्या रंगामध्ये
मी रंगून जावे,
भास नको मज, तुम्हा सांगतो
हे खरे खरे व्हावे...

– सुमती पवार

शब्दार्थ : स्वार होणे – आरूढ होणे, बसणे. **विहरणे** – आकाशात उडणे, फिरणे. **क्षितिज** – आकाश जेथे जमिनीला टेकल्यासारखा भास होतो ते ठिकाण. **भरारणारा** – वेगाने वाहणारा. **अलगद** – हळूच. **मिष्कील** – खोडकर. **स्रोत** – ज्यापासून मिळते तो मार्ग. **काळोखाला चिरणे** – काळोख भेदून जाणे. **भास** – भ्रम.

स्वाध्याय

प्र. १. एका–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) कवयित्रीला अवकाशात कसे फिरावेसे वाटते?

(आ) कवयित्रीला गवतावर कसे उतरावेसे वाटते?

(इ) धुके बनून कवयित्रीला काय करावेसे वाटते?

(ई) कवयित्रीला सूर्यकिरण का व्हावेसे वाटते?

प्र. २. खालील कल्पनेचा योग्य अर्थ शोधा.

(अ) सूर्यप्रकाशे वाफ होऊनी पुन्हा पुन्हा परतावे.

(१) सूर्यकिरणांची वाफ व्हावी.

(२) सूर्याच्या उष्णतेने वाफ बनावी.

(३) सूर्याच्या उष्णतेने वाफ बनून पुन्हा दवबिंदू बनावा.

(आ) भास नको मज, तुम्हा सांगतो हे खरे खरे व्हावे.

(१) निसर्गातल्या रंगात रंगून जावे.

(२) वर्णन केलेल्या कल्पना प्रत्यक्षात याव्यात.

(३) कोणतीच गोष्ट भासमान नसावी.

प्र. ३. कवितेतून शोधा. उदा., चंद्राशी खेळणारा–भरारणारा वारा

(अ) अवकाशी विहरणारा – ☐ (ई) ऊर्जेचा स्रोत असणारा – ☐

(आ) गवतावर उतरणारे – ☐ (उ) काळोखाला चिरणारा – ☐

(इ) धरणीवर उतरणारे – ☐

प्र. ४. 'खरे–खोटे' याप्रमाणे काही विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या लिहा.

खरे ⟷ खोटे , ☐ ⟷ ☐ , ☐ ⟷ ☐

प्र. ५. 'मी झाड झाले तर...' अशी कल्पना करून पाच ते सहा वाक्ये लिहा.

प्र. ६. हे शब्द असेच लिहा.

क्षितिज, ऊर्जा, मिष्किल, स्रोत, स्वार, सूर्यप्रकाश, चंद्र, निसर्ग, पुन्हा.

प्र. ७. 'झुळूक मी व्हावे' कवी दा.अ. कारे यांची कविता मिळवून, त्या कवितेचे वर्गात वाचन करा.

प्र. ८. ढगांचे विविध आकार काढा. त्यांना रंग द्या व त्यांत कवितेचे एकेक कडवे सुंदर अक्षरांत लिहा.

प्र. ९. कवयित्रीला जशी अनेक रूपे घ्यावीशी वाटतात, तसे तुम्हांला कोण कोण व्हावेसे वाटते ते लिहा.

प्र. १०.खालील चित्र पाहा. चित्राचे वर्णन करा.

प्र. ११.खालील वेळेला सूर्याचा रंग कसा दिसतो त्याचे निरीक्षण करा. लिहा.



उपक्रम : तुमच्या कल्पनेने या कवितेचे वर्णन करणारे निसर्गचित्र काढा व रंगवा.

- **खालील वाक्यांत कंसातील योग्य सर्वनामे घाला.**

  (आपण, ती, त्यांनी, स्वतः)

  (अ) हसिना खेळाडू आहे. ..... रोज पटांगणावर खेळते.

  (आ) बाईंनी मुलांना खाऊ वाटला. ..... मुलांशी गप्पा मारल्या.

  (इ) घरातील सगळे म्हणाले, '..... सिनेमाला जाऊ.'

  (ई) जॉनने ..... चहा केला.

- **खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य सर्वनामे लिहा.**

  (अ) ..... गावाला जा. (तुम्ही, आपण, आम्ही)

  (आ) आईने ..... डबा भरून दिला. (त्याने, तिचा, आपण)

  (इ) आज ..... खूप मजा केली. (ती, स्वतः, आम्ही)

  (ई) दादा धावपटू आहे. ..... रोज पळतो. (तो, ती, त्या)

  (उ) ..... बाळाला मांडीवर घेतले. (तिला, तिने, तिचा)

  (ऊ) मोत्याने धावत येऊन ..... स्वागत केले. (आम्हांला, आपण, आमचे)

BTKOT4